# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत

## <u>भू-संजीवनी व्हर्मी कंपोस्टिंग (गांडूळ कंपोस्ट सेंद्रिय खत)</u>

## कामाचे सविस्तर अंदाज पत्रक

## सन

लाभार्थ्यांचे नांव श्री / श्रीमती -

गांव - तालुका - जिल्हा -

गट क्र. / घर क्र. -

आकारमान - 4.00 / 1.15 / 0.60 मीटर.

**कृषी अधिकारी**
विशेष तांत्रीक अधिकारी
(मगांराग्रारोहयो)
पंचायत समिती

Scanned with CamScanner

## संमत्ती पत्रक / शेतक-यांचा अर्ज.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन - २०१६-१७

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने माझ्या / आमच्या विनंतीवरून या सोबतच्या अनुसुचींमध्ये आमच्या नांवासमोर अनुक्रमाने दर्शविल्याप्रमाणे **मौजे -** गावातील आमचा / माझ्या **गट क्रमांक -** मध्ये पुढीलप्रमाणे म्हणजे **भू-संजीवनी व्हर्मी कंपोस्टिंग (गांडुळ कंपोस्ट सेंद्रिय खत)** ही कामे घेण्याचे मान्य केलेले आहे.

त्याअर्थी आम्ही लाभार्थी खालील अटीच्या अधिन राहुन सदर कामास संमत्ती पत्र देत आहोत.

१) **भू-संजीवनी व्हर्मी कंपोस्टिंग (गांडुळ कंपोस्ट सेंद्रिय खत)** कामासाठी लागणारी जागा आम्ही विनामुल्य देऊ त्याबाबत कोणताही मोबदला मागणार नाही.

२) **भू-संजीवनी व्हर्मी कंपोस्टिंग (गांडुळ कंपोस्ट सेंद्रिय खत)** सदरचे काम संपुर्ण शासकीय खर्चाने होणार असुन त्या बाबतची कल्पना आम्हाला दिलेली आहे. त्याची परतफेड करण्याची बंधन खातेदारावर किंवा कोणावरही राहणार नाही व अंदाजपत्रकातील अनुदाना व्यतिरीक्त लागणारा जास्तीचा खर्च मी / आम्ही करण्यास तयार आहोत.

३) **भू-संजीवनी व्हर्मी कंपोस्टिंग (गांडुळ कंपोस्ट सेंद्रिय खत)** आम्ही / मी शेती कामासाठी उपयोग करून घेवू व त्याची निगा, दक्षता व दुरूस्तीची जबाबदारी आमची राहील.

४) वरील बाबींवरती यापुर्वी कुठलाही लाभ घेतलेला नाही.

**भू-संजीवनी व्हर्मी कंपोस्टिंग (गांडुळ कंपोस्ट सेंद्रिय खत)** कामासाठीच्या अटी व शर्ती मला / आम्हाला संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांनी समजावुन सांगितल्या असुन त्या अटीच्या अधिन राहुन मी / आम्ही हे संमत्तीपत्र व करारपत्र करून देत आहोत.

| अ.क्र. | शेतकरी / लाभार्थीचे नांव | गांव | गट क्र. / घर क्र. | क्षेत्र | संमत्ती स्वाक्षरी / सही / अंगठा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**भू-संजीवनी व्हर्मी कंपोस्टिंग (गांडुळ कंपोस्ट सेंद्रिय खत)** कामाबाबत संपुर्ण माहिती त्याबाबतच्या अटी व जबाबदा-या आम्ही शेतक-यांस समजावुन सांगितल्या व त्यानुसार संमत्तीपत्र प्राप्त केले असे.

Scanned with CamScanner

गांडूळ कंपोस्ट खत निर्मिती पद्धत :-

१) बांधलेल्या टाक्याच्या तळाच्या पृष्ठभागात विटांचा तुकड्याचा थर द्यावा. त्यावर वाळू आणि त्यावर मातीचा थर द्यावा. एकत्रित थर हा ६ इंच असावा. या थरास पुरेसे पाणी द्यावे आणि त्यावर २४ तास लक्ष ठेवावे. जर मुंग्या दिसुन आल्या तर या मुंग्यापासून गांडूळाचे संरक्षण होण्यासाठी त्यावर राखेचा थर द्यावा. बेडूक, उंदीर, गोम, तसेच इतर प्राण्यांपासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने शेडच्या कडेने योग्य संरक्षण व्यवस्था करावी.

२) केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ३.६ मी. x 1 मी. x ०.७५ मी. आकारमानाच्या टाक्याचे बांधकाम अपेक्षित आहे. परंतु शेतावर प्रत्यक्ष काम करताना जास्त उंचीच्या टाक्यात, खताची काढणी आणि धिगांचा रचना करताना विशेषतः महिला मजुरांना अडचणी येतात. या आकाराऐवजी ४.० मी. x १.१५ मी. x ०.६० मी. आकारमानाचे टाक्याचे बांधकाम करण्यात यावे. सामाईक भिंतीस तळाकडील भागास दोन थरांत, दोन्हीही वाफ्यांमध्ये गांडूळाची हालचाल होण्यासाठी छिद्रे ठेवावीत.

३) त्यामध्ये उत्पादनासाठी कच्चे साहित्य - अर्धवट कुजलेला पालापाचोळा जसे तण / गवत / टाकावू कचरा / झाडांची पाने / कोवळ्या फांद्या / भाजीपाल्याची अवशेष / मळणीनंतरचा भुसा, कोंडा इ. वनस्पतीजन्य पदार्थ, तयार शेणखत, जनावरांचे मलमूत्र इ. उपलब्धतेनुसार. या मिश्रणाचा ढीग कुजण्यासाठी वरील नमूद एका टाक्यात रचावा. १० ते १२ दिवसांनी दुसऱ्या टाक्यात वर नमूद केल्याप्रमाणे रचावा.

४) या रचलेल्या ढिगातील तापमान २५ ते ३० डिग्री सें. पेक्षा जास्त असू नये. याकरिता ढीग २४ तास निरीक्षणासाठी ठेवावा. गांडूळाना ३० डिग्रीच्या वर तापमान मानवत नाही. म्हणून रचलेल्या धिगाचे तापमान या मर्यादेत असल्यासच अंदाजे ५०० गांडुळे टाक्यात सोडावीत. अर्धवट कुजलेले साहित्य वापरामुळे रचलेल्या धिगाचे तापमान मर्यादेत राहून कुजण्याचे क्रियेतून निघणारे वायू गांडूळाना त्रासदायक ठरत नाहीत.

५) गांडूळाच्या संरक्षणासाठी बेडवर जुनाट पोत्याचे किंवा इतर स्थानिक सामग्रीचे आच्छादन द्यावे. धिगाची आर्द्रता ८० % राखण्यासाठी आच्छादनावर नियमित दररोज पाणी शिंपडावे. साधारणतः सुरुवातीस ४० ते ६० दिवसात खत तयार होते.

६) खत पूर्णतः तयार असल्याची खात्री झाल्यावर शेवटच्या ४ ते ५ दिवसात आच्छादन काढून पाणी शिंपडणे बंद करावे. जस-जसे खत कोरडे होईल तस-तसे गांडुळे आत खाली शिरतील तसेच नजीकच्या वाफ्यामध्ये मधल्या भिंतीतील छिद्रावाटे प्रवेश करतील.

७) कोरडे खत गोळा करून ते रेती गळण्याच्या चाळणीने (२.५ मिमि ) गाळून घ्यावे.

८) गांडूळ खताचा विविध पिकांसाठी जोर खत म्हणुन उपयोग करावा.


Scanned with CamScanner


**गांडूळ खत तयार करण्यास शेड उभारणी :-**


सूर्यप्रकाश, थंडी आणि पाऊस या तिन्हीपासून गांडूळाचे रक्षण करण्यासाठी निवाऱ्याची गरज असते. त्यासाठी पाचटाचे छप्पर किंवा सिमेंट पत्र्याचे शेड असावे. शेडची रुंदी १० फुट ठेवावी तर लांबी गरजेनुसार १४ फुटापेक्षा जास्त ठेवावी. मध्यभागी छप्पराची उंची ७ ते ८ फुट ठेवावी आणि बाजूंची उंची ४ फुट ठेवावी. सुरक्षीततेसाठी लांबीच्या दोन्ही बाजूला कुड घालावा. रुंदीच्या बाजूला दरवाजा ठेवावा. त्यात गांडूळ खत तयार करण्याकरिता टाक्याचे बांधकाम करणे अभिप्रेत आहे.

Scanned with CamScanner

## रहमी कंपोस्ट - संकल्प चित्र






Scanned with CamScanner